# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४४, दुरध्वनी क्र. : ०२०-२७६५२९३४/३५

## जाहिरात

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयात खालील पदे कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पारिश्रमिक तत्वावर ११ महिने कालावधीकरिता नेमणूका करावयाच्या आहेत. सदर पद संख्येत बदल होऊ शकतो.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | मुलाखतीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ७ | १९/०८/२०१६ | सकाळी ११.३० ते दुपारी ४.०० |
| २ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ४ | | |
| ३ | तारतंत्री | १ | | |
| ४ | नियोजन सहाय्यक | ४ | २०/०८/२०१६ | सकाळी ११.३० ते दुपारी ४.०० |
| ५ | प्रमुख भूमापक | १ | | |
| ६ | भूमापक | ३ | | |
| ७ | सहाय्यक आरेखक | १ | | |
| ८ | सहाय्यक कार्यालय अधिक्षक/वरिष्ठ लिपीक | ६ | | |

वर नमुद केलेल्या पदावरून किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी हे अर्ज करण्यास पात्र राहतील. प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज पदनामाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

शासकीय/निमशासकीय संस्थांच्या विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून खालील नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत पात्र राहील. (दिनांक ११/०८/२०१६ रोजीचे वय विचारात घेतले जाईल) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ मधील परि.९ अनुसार पारिश्रमिक निश्चित करण्यात येईल.

**अर्ज करण्याची पद्धत व सर्वसाधारण सुचना :-**

१. उमेदवाराने फुलस्केप कागदावर स्वतःचे संपूर्ण नावं (आडनांव प्रथम), जन्मदिनांक, वय, लिंग, स्त्री/पुरुष, पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहित) व मोबाईल क्रमांक, ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेत असताना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम तसेच सध्या मिळणारे निवृत्ती वेतन याबाबतचा तपशिल टंकलिखित करून अर्ज मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४ या पदनामाने सादर करावा.

अ) अर्जासोबत अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो सांक्षांकित करून चिकटवावा. अर्जाच्या लिफाफ्यावर ज्या पदाकरिता अर्ज केला आहे त्या पदाचे नाव न चुकता नमुद करावे.

ब) अर्जामध्ये जाहिरात क्रमांक /२०१६, (वृत्तपत्राचे नांव, पदाचे नाव न चुकता नमुद करणे)

अर्जासोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्रे सांक्षांकित करून जोडावे.

२. शासकीय, निशासकीय संस्थेकडील सेवानिवृत्तीचा आदेश.

३. शैक्षणिक अर्हता धारण व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती.

४. मुलाखतीचे वेळी मूळ प्रती सोबत आणाव्यात.

५. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

अर्जासोबत स्वतःचे नाव, पत्ता तसेच दुरध्वनी/मोबाईल क्रमांक लिहिलेला व रूपये ५/- चे पोस्टेज स्टॅम्प चिकटवून २३×१२ से.मी. आकाराचा लिफाफा जोडणे आवश्यक राहील. अर्ज खालील पत्त्यावर दिनांक ११/०८/२०१६ कार्यालयीन वेळेपर्यंत पोहचेल असा पाठवावा. किंवा समक्ष आणून द्यावे. निवड झालेल्या उमेदवारांना विहित केलेल्या नमुन्यात रूपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र द्यावे लागेल.

तसेच निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असेल, व याबबत कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

टिप : वरील दिनांकास मुळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित राहावे. मुलाखतीबाबत वेगळे पत्र पाठविले जाणार नाही.

पत्ता : मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४११०४४.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी

जाहिरात क्र. ३५/२०१६

लागला 2/08/16

PRO
318